**Press Clippings**

| Publication | Edition | Date | Page Number | Subject |
|---|---|---|---|---|
| Maharashtra Times | Mumbai | 01/12/2017 | 10 | Mintage World |

# रुपयाच्या नोटेची शंभरी!

म. टा. खास प्रतिनिधी मुंबई

चलनात असलेल्या एक रुपयाच्या नोटेने गुरुवारी वयाची शंभरी पूर्ण केली. ३० नोव्हेंबर १९१७मध्ये तत्कालीन ब्रिटिश सरकारने एक रुपयाची नोट चलनात आली. तेव्हापासून ही नोट कायम केंद्र सरकारतर्फे ही नोट चलनात आणली गेली आहे. कॉइनेज कायद्यानुसार रिझर्व्ह बँकेला दोन रुपये व त्यावरील मूल्याच्या नोटा छापण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. एक रुपया मूल्याची नोट त्यामुळेच सरकार छापत आहे. नोटेची छपाई १९९४मध्ये केंद्र सरकारने बंद केली होती. त्यानंतर २०१५मध्ये ती पुन्हा सुरू करण्यात आली.

नोटा, नाणी, पोस्टाचे स्टॅम्प, जुने दस्तैवज यांचे एक प्रदर्शन सध्या मुंबईत इम्पेक्स-२०१७ या नावे वर्ल्ड ट्रेड सेंटरमध्ये भरले आहे. हे प्रदर्शन ४ डिसेंबरपर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ७ या वेळेत सुरू राहणार आहे. या प्रदर्शनात मिन्टेजवर्ल्डतर्फे एक रुपयाच्या नोटेचा प्रवास उलगडून दाखवण्यात आला आहे. प्रदर्शन सर्वांसाठी खुले आहे.




## पहिली नोट इंग्लंडमध्ये

ब्रिटिशांनी ज्या वेळी ही नोट सुरू केली, त्या वेळी तिची छपाई इंग्लंडमध्ये होत होती. इंग्लंडमध्ये छपाई करून ती देशात वितरित केली जात असे. पहिल्या महायुद्धाच्या दरम्यान टांकसाळींमध्ये निर्माण झालेल्या समस्येमुळे एक रुपयाच्या नोटेच्या छपाईचा विचार पुढे आला. स्वातंत्र्यपूर्व काळातील एक रुपयांच्या नोटेवर पाचव्या जॉर्जचा फोटो प्रसिद्ध होत असे. ही नोट १९२६मध्ये पहिल्यांदा चलनातून बाद करण्यात आली.

## गरज का भासली?

पहिल्या महायुद्धापूर्वी देशात चांदीची नाणी चलन म्हणून वापरली जात असत. मात्र, युद्धानंतर चांदीच्या किमतीत मोठी वाढ झाल्याने नाणी बंद करून नोटा छपाईचा निर्णय घेण्यात आला. आश्चर्याची बाब म्हणजे विभाजनानंतरही काही वर्षे पाकिस्तानातही रुपयाची नोट चलनात होती.

## स्वातंत्र्यानंतर झाले बदल

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशातील चलनी नोटांवर आणि नाण्यांवर ब्रिटिश राजाऐवजी सारनाथ येथील अशोकचिन्हातील तीन सिंह आणि अशोक चक्राचा समावेश करण्यात आला. 'मिंटेज वर्ल्ड'नुसार १०० वर्षांमध्ये रुपयाच्या जवळपास १२५च्या प्रकारच्या नोटा चलनात आल्या. त्यावर २८ प्रकारचे डिझाइन करण्यात आले होते.

## अशी ही रुपयाची नोट..

- १९१७, १९३५ आणि १९४०मध्ये रुपयाच्या नोटेची छपाई
- १९३५च्या नोटेवर जे. डब्ल्यू. केली तर, १९४०च्या नोटेवर सी. ई. जोन्स यांची स्वाक्षरी आहे.
- स्वातंत्र्योत्तर १९४९मध्ये पहिली रुपयाची नोट सादर. या नोटेवर पहिली स्वाक्षरी केआरके मेनन यांची होती.
- १९१७मध्ये जारी करण्यात आलेल्या एक रुपयाच्या नोटेची किंमत आजच्या ४०० रुपयांएवढी होती.